# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३००/२००८/ दिनांक :

श्री. अशोक दादा चव्हाण, अर्जदार
रा. वळसंग, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, संख, जि. सांगली

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : १९.०५.२००९

सदरील तक्रार अर्ज हा अर्जदार श्री. अशोक दादा चव्हाण, रा. वळसंग यांनी त्यांना घरगुती वीज जोडणी मिळणे संबंधात केला आहे. त्यांचे म्हणणे की, मूळ मागणी अर्ज देऊन बराच कालावधी लोटला असतांनाही त्यांनी वीज जोडणी मिळाली नाही. पुढे त्यांनी दि. २८.१०.२००८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे अर्ज दिला होता. परंतु कक्षाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही. सबब या मंचाकडे त्यांनी ता. १६.१२.२००८ रोजी अर्ज दाखल केला.

या प्रकरणामध्ये वि.प.ला नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्याप्रमाणे वि.प.तर्फे ता.१८.२.२००९ रोजी म्हणणे देण्यात आलेले आहे. पुढे अर्जदाराला त्यांच्या अर्जाप्रमाणे ता. १८.१२.२००८ रोजी कोटेशन देण्यात आलेले होते. पुढे त्यांनी ता. १६.१.२००९ रोजी कोटेशनची रक्कम भरली आहे.



पुढे ता. १६.१.२००९ रोजी त्यांनी चाचणी अहवालही दाखल केला. परंतु प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता घरामध्ये फिटींग केलेले नव्हते. तसेच वि.प.चे म्हणणे की, अंतर्गत कक्षाने दिनांक ३०.१.२००९ रोजी त्यांचेकडील तक्रारीचा निर्णय दिला असून कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा करण्याचा आदेश दिला आहे. त्याप्रमाणे अर्जदाराचे घरामध्ये फिटींग करुन घेतले व ता. १२.२.२००९ रोजी अर्जदारास विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.

या प्रकरणाची सुनावणी सांगली येथे ठेवण्यात आली. परंतु त्यावेळी अर्जदार स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी श्री. मुल्ला हजर झाले नाहीत. वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ हजर होते व त्यांनी अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे ता. १२.२.२००९ रोजी वीज जोडणी दिली असल्याचे सांगितले व अर्जदाराकडून मिळालेली पावती हजर केली. तसेच सदरच्या अर्जदाराला विद्युत पुरवठा दिला गेला असलेने त्याची आता वि.प.कडे कोणतीही तक्रार नाही तसेच त्यांनी दंडाच्या रकमेची मागणी मागे घेतली आहे व अशा बाबतचे या मंचाकडे ता. १५.४.२००९ रोजी पत्र प्राप्त झाले आहे.

वरील बाबींचा विचार करता, अर्जदाराने दिलेल्या ता. १६.१.२००९ च्या चाचणी अहवालाप्रमाणे घरामध्ये फिटींग केले नसलेने त्यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे विद्युत पुरवठा करण्यात आलेला नव्हता. तसेच पुढे त्यांनी जरुर ते फिटींग केल्यानंतर ता. १२.२.२००९ रोजी त्यांना विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. परिणामी, अर्जदाराची तक्रार उरत नाही. नुकसान भरपाई बाबत अर्जदाराने स्वत:च आपल्या सहीनिशी नुकसान भरपाईची मागणी मागे घेतली आहे. सबब प्रकरण फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश.

## आदेश

१) तक्रार अर्ज क्र. ३००/०८ फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १९.०५.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..